# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

(क) **(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६, बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६, सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ व मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) (अनुक्रमांक १):-**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, इद्रिस नायकवडी, दादाराव केचे, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संजय केणेकर, राजहंस सिंह, संदीप जोशी, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, मराठा मिलिटरी लँडस्केप्स संकल्पनेंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे त्यायोगे राज्यातील पर्यटनात वाढ होणार असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे, राज्यातील तीर्थक्षेत्र विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेखाली माहे डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'

कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक २):-**

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, अमरिशभाई पटेल, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, श्रीकांत भारतीय, इद्रिस नायकवडी, अमित गोरखे, किरण सरनाईक, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री दादाराव केचे, रणजितसिंह मोहिते-पाटील, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, राजहंस सिंह, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, वसंत खंडेलवाल, संजय केणेकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, संदीप जोशी, **वि.प.स. यांचा म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील जनता निरोगी रहावी व तिचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम सुखसंपदा' उपलब्ध व्हावी याकरिता राज्य शासनाने "आयुष्यमान भारत योजना","महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना","राजीव गांधी जीवनदायी योजना" इत्यादी योजनांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला जलद, पारदर्शक व रुग्णस्नेही उपचार मिळण्यासाठी प्रयत्न केले असणे, राज्यातील सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्याचे प्रयोजन असणे, त्याकरिता वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात येणे, राज्य प्रदूषण मुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात येणे, 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे सोबत सामंजस्य करार करण्यात येणे, या कराराद्वारे प्रत्येक तालुक्यात किमान १ मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणे, मुंबईत १२ डब्यांच्या लोकलऐवजी १५ डब्यांच्या लोकल सुरु करण्याचे प्रस्तावित असणे, पालघर जिल्हयात औद्योगिक टाऊनशीपच्या माध्यमातून चौथी मुंबई संकल्पना राबविण्याचे प्रस्तावित असणे, पर्यावरणपूरक विकास योजनेच्या माध्यमातून सन २०५० पर्यंत कार्बन कमी करण्याचे नियोजन असणे, सन २०२५-२०३० साठी शहराचा विकास आराखडा तयार करण्यात येणे, या माध्यमातून ट्रॅफिक कमी करणे, हरितक्षेत्र वाढविणे, कनेक्टीव्हीटी देणे, स्वस्त गृहनिर्माण योजना राबविणे इ. प्रयत्न असणे,

राज्य प्रदूषण मुक्त करण्याचा प्रयत्न आणि मुंबईकरांना सुखकर प्रवास, खड्डेमुक्त व प्रदूषणमुक्त मुंबई इत्यादीसाठी वाहतुकीचे विविध पर्याय उपलब्ध करण्याकरिता व मुंबईतील लोकसंख्या नियंत्रित करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव)** —

**श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री. शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. यांचा नियम २५९ अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलीस प्रशासनावरील शासनाचे सुटलेले नियंत्रण, भोंदू बाबा अशोक खरात यांचे कारनामे, राज्यात लहान बालकांच्या अपहरणात व बलात्कारात झालेली वाढ, राज्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे महिला वर्गात पसरलेले भितीचे वातावरण, या घटनांना आळा घालणारा व महिलांना कायदेशीर संरक्षण देणारा शक्ती कायदा अद्याप प्रतीक्षेत असणे, मुंबईत बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांच्या घरांचा प्रश्न व कामगार बेघर झाल्याने करावयाची उपाययोजना, बांधकाम कामगार यांचे बोगस नोंदणी रॅकेट उघडकीस येवून करोडो रुपयाचा गैरव्यवहार करणे, तसेच कामगार अधिकारी यांच्याकडून अधिकाराचा गैरवापर करुन चुकीचे निर्णय घेण्यात येणे, राज्यातील शासन निधीअंतर्गत व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत कामे कंत्राटदारांना उपवर्ग करताना कोट्यवधी रुपयांची अनियमितता होणे, राज्यातील विविध महामंडळाची घोषणा होवूनही निधी अभावी बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने जनतेच्या भावना व संताप तीव्र होणे, बंगलोर येथील विहान डायरेक्ट सेलिंग बंगलोर (क्यनेट) या कंपनीकडून कर्ज घेतलेल्या महिलांची लाखों रुपयांची झालेली फसवणूक, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये वाढत चाललेल्या गैरव्यवहाराच्या घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठया प्रमाणावर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असणे, विविध खात्यातील बदल्या व बढत्या यामध्ये होत असलेली अनियमितता व गैरव्यवहार, अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार उघडकीस येऊनही दोषी अधिका-यांवर कठोर कारवाई होत नसणे, या गैरव्यवहाराच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही "

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क)** बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील पुढे ढकलण्यात आलेला श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांचा "मुंबई येथील आरे दुग्ध वसाहतीत बेकायदेशीर वृक्षतोड तसेच काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ८५५०.

**(ख)** तारांकित प्रश्न

**(ग)** अतारांकित प्रश्नोत्तरांची तेरावी ते एकवीसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : **(क)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "मार्च २०२३ ला संपलेल्या कालावधीचा अहवाल" (२) "मार्च २०२३ ला संपलेल्या कालावधीचा राज्य महसुलावरील अहवाल" व (३) "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र शासन यावरील अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) सन २०२६-२०२७ हे प्रकाशन सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री (नगरविकास)** : "पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे यांचा सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचा अनुक्रमे बेचाळीसावा, त्रेचाळीसावा, चव्वेचाळीसावा, पंचेचाळीसावा, सेहचाळीसावा, सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **आदिवासी विकास मंत्री** : "कळमनुरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या हद्दीतील नामांकित शाळांमध्ये अनेक सोईसुविधांचा अभाव असणे" या विषयावरील डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये

लक्षवेधी सूचना क्रमांक ५६३ वरील चर्चेच्या वेळी दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**चार : "पंचायती राज समितीचा पहिला, दुसरा, तिसरा व चौथा अहवाल सादर करणे."**

**पाच : "अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे"**

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(१) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७१ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

विहान डायरेक्ट सेलिंग बंगलोर (क्युनेट) या कंपनीकडून राज्यातील कर्ज घेतलेल्या हजारो महिलांची झालेली फसवणूक.

**(२) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६४ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे शहर अभियंता यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत.

**(३) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६८ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

पुणे महानगरपालिका क्षेत्रात ७० हून अधिक ठिकाणी होणारा मैलापाणी मिश्रित अशुद्ध पाणीपुरवठा आणि नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका.

**(४) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६१ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात या सर्व झुणका भाकर केंद्रांना संरक्षित करून पात्र करण्याबाबत, तसेच तोडण्यात आलेल्या दोन झुणका भाकर केंद्रांना तातडीने मोबदला देण्याबाबत.

**सात : (क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत**, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागांतर्गत येणाऱ्या गोवंडी येथील नगरभूमापन क्र.०७ (पैकी), मौजे बोर्ला, ता.कुर्ला येथील झोपडपट्टी सुधारणा योजनेच्या अंतर्गत नियोजित असणाऱ्या पंचशील व एकता एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्वसन योजनेत गंभीर स्वरूपाची अनियमितता झालेली असणे, सन २००५ मधील मूळ परिशिष्ट-२ मध्ये नावे नसतानाही, नंतरच्या काळात बनावट कागदपत्रे आणि बोगस सर्व्हे पावतींच्या आधारे शेकडो व्यक्तींना 'पात्र' केलेले असणे, विशेष म्हणजे सद्य:स्थितीत सदर बोगस लाभार्थींचे पुरवणी परिशिष्ट II, सुधारित सर्व्हे व बांधकाम नकाशा, प्रकल्पबाधित लाभार्थी सदनिका माहिती, भोगवटा व पूर्णत्वाचे प्रमाणपत्र इत्यादी कायमस्वरूपी अभिलेखांच्या नस्ती/संचिका गहाळ असणे, तसेच बोगस लाभार्थ्यांच्या नावावर विकासकाने अतिरिक्त एफ.एस.आय. घेऊन, अतिरिक्त सदनिका तयार करून, आर्थिक फायदा मिळवून, शासनाची फसवणूक केलेली असणे, यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच पोलीस प्रशासन यांच्याकडे पुराव्यांसह तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे, त्याअनुषंगाने, सदर गंभीर प्रकरणात संबधितांवर तात्काळ फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करणे, या दोन्ही पुनर्वसन प्रकल्पांची उच्चस्तरीय समिती स्थापन करून सखोल चौकशी करणे, चौकशी पूर्ण होईपर्यंत झोपडपट्टीवासियांचे सदर प्रकल्पांमध्ये पुनर्वसन स्थगित करणे, विकासक लकडावाला यांनी यापूर्वी बांधकाम केलेल्या व आताच्या दोन्ही प्रकल्पांची चौकशी करून, दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे पिंपर, ता.गुहागर, जि.रत्नागिरी येथे श्री सोमजाई स्टोश क्रशर कंपनीकडून बेकायदेशीररित्या खडी उत्खननासाठी मोठे स्फोट घडवून येत असल्याची बाब निदर्शनास येणे, सदरहू कंपनीकडून घडविण्यात येणाऱ्या बेकायदेशीर स्फोटांमुळे स्थानिक नागरिकांच्या घरांची मोठया प्रमाणात पडझड होत असून त्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत असणे, तसेच या परिसरात असलेल्या मातीच्या धरणाची देखील या

स्फोटामुळे पडझड होत असून या धरणास धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास येणे, उक्त सर्व बाबी लक्षात घेता सदरहू क्रशर कंपनी विरूध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक निर्मल ग्रामपंचायत पिंपर, ता.गुहागर, जि.रत्नागिरी यांनी सन २०१९ पासून आजतागायत वारंवार ठराव मंजूर करूनही या प्रकरणी अद्याप कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू क्रशर कंपनीला केवळ ६०० ब्रास खडी/वाळू उत्खननाची मंजूरी असताना त्यापेक्षा कित्येक अधिक पटीने अवैध उत्खनन सुरू असून त्याकडे संबंधित तहसिलदार, मंडळ अधिकारी यांचेकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, बेकायदेशीररित्या सुरूंग लावून गावच्या घरांना तसेच धरणाला धोका निर्माण करणारा हा स्टोन क्रशर तातडीने बंद करून कंपनी विरूध्द तसेच या कंपनीस सहाय्य करणारे संबंधित दोषी शासकीय अधिकारी यांचे विरोधात कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जीएमसी नांदेड येथील स्त्रीरोग विभाग ओपीडी क्र.११८ माहे डिसेंबर, २०२२ मध्ये मौजे कपाशी, ता.लोहा येथील एका महिलेला मासिक पाळीचा त्रास होत असल्याने शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी येथे स्त्री रोग शास्त्र विभाग प्रमुख तत्कालिन अधिष्ठाता यांनी तपासणीदरम्यान अश्लील वर्तन केल्याची घटना घडणे, या प्रकरणी समिती नेमण्यात येणे, या गठीत करण्यात आलेल्या समितीच्या सदस्यांनी काही कारणे देऊन तत्कालिन अधिष्ठाता यांच्या विरुध्दच्या तक्रारींच्या चौकशी समितीत सदस्य म्हणून काम करणे उचित व शक्य होणार नसल्याचे अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना कळविण्यात येणे, यानंतर डॉ.वैशाली इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने गोपनीयरित्या सदर घटनेविषयी माहिती घेऊन रुग्णालयातील कर्मचा-यांचे जबाब नोंदविण्यात आल्यानुसार या प्रकरणात तत्कालिन अधिष्ठाता यांनी सदर स्त्री रुग्णाशी गैरवर्तन केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास येणे, तसेच सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी, महाराष्ट्र सुरक्षा बल, यांनीही सदर प्रकरण घडल्यासंदर्भात आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसा अहवाल सादर केलेला असणे, त्याचबरोबर दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी या संस्थेत "२४ तासात २४ मृत्यू" या सदराखाली आलेल्या बातमीच्या संदर्भात डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेडचे तत्कालीन अधिष्ठाता यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी औषधांचा पुरेसा साठा नव्हता असे विधान करुन या संस्थेची व पर्यायाने शासनाची नाहक बदनामी करणे, एकूणच तत्कालीन अधिष्ठाता यांच्यामुळे शासनाची

बदनामी होत असतानाही पिडीत महिलेला न्याय मिळवून देण्याकरिता अद्याप कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण होणे, तत्कालीन अधिष्ठाता यांच्या गैरवर्तनामुळे रुग्णालयाची नव्हे तर शासनाची बदनामी होऊ नये याकरिता शासनाने त्यांचेवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील साकूर आणि परिसरातील सार्वजनिक वाहतूक व दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे साकूर-तातकावाडी ते भंडारदरी (४.० किमी), साकूर-देवराई (२.८ किमी), दळवणे फाटा ते पायऱ्याडी (४.० किमी), राज्यमार्ग-१६ ते बरबंडी (६.० किमी) आणि देवराई ते कोठे मलकापूर (४.० किमी) या पाच रस्त्यांची स्थिती अत्यंत दयनीय झालेली असणे, मुख्यमंत्री व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अवघ्या एक-दोन वर्षांपूर्वी पूर्ण झालेली ही कामे ठेकेदारांनी अत्यंत निकृष्ट दर्जाची केलेली असल्याने अल्पावधीतच मोठमोठे खड्डे पडलेले असणे आणि डांबरी थर उखडून वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण झालेला असणे, या मुख्य मार्गांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे परिसरात छोटे-मोठे अपघात वारंवार घडत असून वाहतुकीची कोंडी होत असल्याने ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत असणे, ठेकेदारांच्या निकृष्ट कामामुळे शासकीय निधीचा अपव्यय होऊन नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू असणे, तरी शासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन हमी कालावधीत असलेल्या या रस्त्यांची संबंधित ठेकेदारांकडून तात्काळ दुरुस्ती करून घेणे, दोषींवर दंडात्मक कारवाई करणे आणि दळणवळण सुरळीत करण्यासाठी निश्चित कालबद्ध मर्यादेत हे मार्ग खड्डेमुक्त करण्याबाबत प्रशासकीय स्तरावर तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**आठ : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**नऊ : <u>मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव</u> —**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई यांचेविरूध्द

दिनांक २ मे, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**(२)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. प्रविण दरेकर यांनी श्रीमती सुषमा अंधारे, प्रवक्त्या शिवसेना (उबाठा) गट व स्टँडअप कॉमेडियन श्री.कुणाल कामरा यांचेविरूध्द दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**दहा : (१)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी "सत्यलढा" स्थानिक युट्यूब चॅनलचे पत्रकार श्री. गणेश सोनावणे (सोनोने), श्रीमती हर्षदा सोनावणे (सोनोने), श्री. अमोल नांदुरकर व श्री. अंकुश गावंडे, (स्थानिक युवक) यांचेविरुध्द दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाच्या प्रकरणासंदर्भात दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी सभागृहाने संमत केलेल्या ठरावानुसार श्री. गणेश सोनावणे (सोनोने), श्रीमती हर्षदा सोनावणे (सोनोने), श्री. अमोल नांदुरकर व श्री. अंकुश गावंडे, (स्थानिक युवक) यांचा लिखित स्वरूपातील माफीनामा सादर झाल्यानंतर त्यांना सभागृहाद्वारे सक्त ताकीद देणे.

**(२)** सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. श्रीकांत भारतीय व श्री. प्रविण दरेकर यांनी श्री.सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो. रत्नापूर, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याविरूध्द दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेल्या विशेषाधिकारभंग व अवमानाच्या प्रकरणासंदर्भात दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी सभागृहाने संमत केलेल्या ठरावानुसार श्री. सुर्यकांत हौसराव मोरे यांचा लिखित स्वरूपातील माफीनामा सादर झाल्यानंतर त्यांना सभागृहाद्वारे सक्त ताकीद देणे.

**अकरा : शासकीय विधेयके —**

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ — महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(ग) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६

**बारा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्यातील अमरावती जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या अतिशय मागास असून या जिल्ह्यातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न हे राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेने अतिशय कमी असून, ते दरडोई उत्पन्न १,९१,४०१ रुपये एवढे असणे, राज्यातील पुणे, ठाणे, मुंबई , नागपूर, कोल्हापूर, रायगड, नाशिक, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग या जिल्हयांमध्ये होत असलेली उद्योगधंद्यांची वाढ पाहता त्याप्रमाणात अमरावती जिल्ह्यात रोजगारक्षम व विकासक्षम उद्योगधंदे नसल्याने येथील नागरिकांना फार कमी प्रमाणात रोजगार उपलब्ध होणे तसेच हा जिल्हा मुख्यत्वे कृषी क्षेत्रातील व्यवसायावर आधारीत असल्यामुळे विविध नैसर्गिक संकटे, शेती करण्यासाठी आवश्यक यंत्रणा नसणे, तसेच बी-बीयाणे, औषधे, खते यांच्या वाढत्या किंमती, मजुरीचे वाढलेले दर आणि मिळत असलेले कमी प्रमाणातील उत्पन्न व धान्याला मिळत असलेल्या कमी किंमती यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न हे अतिशय कमी प्रमाणात असणे, तसेच या जिल्ह्यातील सीमीत औद्योगिक विद्यमानता, स्टार्टअप इकोसिस्टीम कमी असणे, आवश्यक त्या भागाला पुरक असे उद्योग निर्माण न करणे, औद्योगिक गुंतवणूक पाहिजे त्या प्रमाणात न होणे, उद्योगांसाठी पायाभुत सुविधा नसणे अशा विविध कारणांमुळे या जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगार संधी अतिशय अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे या जिल्ह्यातील नागरिकांचे दरडोई अत्यल्प असलेले उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने ते धोरण आखून करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"माहे जून, २०२५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने जावेद अब्दुल रहमान अत्तर विरुद्ध म्हाडा प्रकरणात दिलेला एक महत्त्वपूर्ण निकाल, ज्याचा परिणाम मुंबईतील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासावर होण्याची निर्माण झालेली शक्यता, उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया बरीच गुंतागुंतीची असणे, त्यात जमीन मालकांचे अधिकार, भाडेकरूचे अधिकार, म्हाडा, बृहन्मुंबई

महानगरपालिका इत्यादी प्राधिकरणातील निर्णय प्रक्रिया यामुळे बराच कालावधी लागणे, ही प्रक्रिया गतिमान व्हावी, याकरिता शासनाने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये कलम ७९-अ अन्वये म्हाडा कायद्यात केलेली दुरुस्ती, उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाकरिता कालबद्ध कार्यक्रमाची तरतूद यात करण्यात आली असणे, या सुधारित कायद्यानुसार म्हाडाच्या अनेक कार्यकारी अभियंत्यांनी १३५ प्रकरणात घेतलेले निर्णय व काढलेल्या नोटीसांवरील निकालात मा.न्यायालयाने म्हाडाला निरस्त स्थितीत ठेवायला भाग पाडले असणे, याशिवाय या सर्व प्रकरणात दोन निवृत्त न्यायमूर्तीची एक समिती नेमली असून या सर्व प्रकरणातील कागदपत्रांची छाननी करण्याचे दिलेले आदेश, त्यामुळे मुंबईतील उपकर प्राप्त इमारतींचा प्रलंबित पुनर्विकास, मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाला गती मिळण्यासाठी म्हाडाला सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

## "राष्ट्रगीत."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.